० प्रकरण चौथे ०

लोकसभा

(१९६२-७१ चा श्री जाधव यांचा कार्यकाळ)

प्रकरण चौथे

लोकसभा

तुळशीदासांनी महाराष्ट्र विधीमंडळामध्ये केलेल्या कार्याची व त्यांनी तळमळीने केलेल्या जनतेच्या कार्याची पोहच म्हणून कॉंग्रेस पक्ष श्रेष्ठीने तुळशीदास जाधव यांना प्रथम स्वतःच्या मतदार संघापासून दूर दोन–अडीचशे मैलावर असलेल्या नांदेड या मतदार संघामध्ये कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून उभे केले व तेथे ते 1962 मध्ये स्वतःच्या कर्तृत्वाने व कॉंग्रेस पक्ष श्रेष्ठीच्या प्रयत्नाने प्रथम लोकसभेवर निवडून गेले वनंतरच्या काळातही ते 1967 मध्ये बारामती लोकसभा मतदार संघातून निवडून आले. अशा प्रकारे तुळशीदास जाधव यांनी 1962 ते 1971 पर्यंत लोकसभेमध्ये नांदेड व बारामती या दोन मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केले.

1957 ची लोकसभेची सार्वजनिक निवडणूक –

संयुक्त महाराष्ट्राच्या जनतेच्या जिव्हाळयाच्या ज्वलंत आणि भावनात्मक प्रश्नावर 1957 च्या सार्वत्रिक निवडणूका जिंकण्याचे ठरवले. संयुक्त महाराष्ट्राच्या विषयाला जनतेकडून चांगला प्रमाणात प्रतिसाद मिळत होता. महाराष्ट्राची जनता संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाला प्राधान्य देऊन संघटीत झालेली होती. हया निवडणुकीवर संयुक्त महाराष्ट्राचे भवितव्य अवलंबून होते. 1957 च्या निवडणूकीच्या वेळी तुळशीदास जाधव यांच्यासारखा नेता कॉंग्रेसला लाभला होता. सोलापूर जिल्हयातील जनतेने आपली सर्व ताकद तुळशीदास जाधव यांच्या पाठीशी उभी केली होती. अनेक वेळा तुळशीदासांनी सोलापूर जिल्हा हा कॉंग्रेसचा बालेकिल्ला आहे हे अनेकवेळा

महाराष्ट्रातील नेत्यांना दाखवून दिले होते. 1957 च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीमध्ये तुळशीदास जाधव हे कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवत होते. तर त्यांच्या विरोधात संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार म्हणून बाळासाहेब मोरे हे उभे होते. तुळशीदासांनी सर्व खेडोपाडी जाऊन सा–या जिल्हयात प्रचाराच्या फे–या केल्या. याच वेळी महाराष्ट्र विधानसभेची ही निवडणूक लोकसभेबरोबर सुरू होती . सर्व महाराष्ट्रभर प्रचाराची रणधुमाळी सुरू होती. सर्व जिल्हाभर फिरून तुळशीदास जाधव यांनी सर्व मतदार संघ पिंजून काढले होते. सोलापूर जिल्हयातून लोकसभेच्या राखीव जागेसाठी श्री. सोनवणे हे कॉंग्रेसतर्फे उभे होते. श्री. सोनवणे हे सोलापूर जिल्हा राखीव मतदार संघातून विजयी झाले. परंतु ज्यानी आपल्या कर्तृत्वाने आपल्या कार्याच्या व कर्तव्याने जनतेवर छाप पाडलेल्या तुळशीदास जाधव यांना लोकसभेला पराभव पत्करावा लागला व त्यांचे विरोधी उमेदवार श्री. बाळासाहेब मोरे हे विजयी झाले. [1] या निवडणुकीमध्ये श्री. तुळशीदास जाधव यांना 1,78,175 मते मिळाली. तर त्यांचे प्रतिस्पर्धी श्री. बाळासाहेब मोरे हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे उमेदवार होते. त्यांना 1,85,115 मते मिळाली व श्री. बाळासाहेब मोरे हे 6940 मते जादा मिळवून विजयी झाले. [2]

निवडणुकीमध्ये पराभव झाल्यानंतर श्री. तुळशीदास जाधव यांनी मतदारांचे आभार व्यक्त करताना म्हटले, " सोलापूर जिल्हयातर्फे म्हणजे 11 तालुक्यातून कॉंग्रेसने लोकसभेसाठी मला उभे केले. तेव्हा प्रकृती नादुरूस्त असतानाही 6–7 गावी कॉंग्रेस असेंबलीने उमेदवारानी ठरवलेल्या दिवशी त्या त्या गावी जाऊन प्रचार केला. सोलापूर जिल्हयातील गावोगावच्या जनतेने मोठया आदराने व आपुलकीने माझे स्वागत केले व माझे म्हणणे शांतपणे एकून घेतले. गेली 30

वर्षे ज्या कामगाराशी जनतेने प्रत्येक वेळी मला जवळ करून सतत काम करून घेतले, ज्या जनता जनार्दनाने 1,78,175 मते देऊन मला उपकृत केले आहे त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. मी नम्रपणे पण निश्चयाने जनतेस व कार्यकर्त्यास सांगू इच्छितो की, मी यापुढे सुध्दा माझ्या शक्तीप्रमाणे जनतेची कामे करत रहाणार आहे. मात्र आपण काम करून घेण्यास व तशी संधी देण्यास तयार असावे ही विनंती. अशा प्रकारे निवडणुकीच्या निकालानंतर त्यांनी मतदाराचे आभार व्यक्त करताना आपले विचार व्यक्त केले.[3]

महाराष्ट्र कॉंग्रेस कमिटीने श्री. तुळशीदास जाधव यांच्या पराभवाने फार दु:ख व हळहळ व्यक्त केली. महाराष्ट्रातील कॉंग्रेसजनात पुन:श्च नवचैतन्य निर्माण करून द्यावयाचे असेल तर तुळशीदास जाधवासारखा धैर्याचा, जिद्दीचा व धाडसी नेता महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदावर नियुक्ती करावी असे ठरले. महाराष्ट्र कॉंग्रेस श्रेष्ठीनी आणि महाराष्ट्रात प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या सदस्यांनी दि. 1 मे 1957 रोजी तुळशीदासांची महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या सरचिटणीस पदावर बिनविरोध निवड केली.[4]

1962 ची सार्वत्रिक निवडणूक –

तुळशीदास जाधव यांनी आपल्या कार्याची चुणूक सोलापूर जिल्हयातील जनतेला नव्हे तर सर्व महाराष्ट्रातील जनतेला दाखवली होती. त्यामुळे हिरा कोठेही टाकला तरी चमकणारच या हेतुने कॉंग्रेस कमिटीने श्री. तुळशीदास जाधव यांना सोलापूर जिल्हयापासून दूर असलेल्या नांदेडसारख्या मराठवाडयातील मागासलेल्या जिल्हयातील लोकसभा जागेकरिता कॉंग्रेसचे

उमेदवार म्हणून उभे केले होते. तुळशीदासांच्या नांदेड जिल्हयातील उमेदवारीला तेथील स्थानिक नेते श्री. शंकरराव चव्हाण, खा. व्यंकटराव तरोडेकर, शामराव कदम, साहेबराव देशमुख, गणपतराव पाटील इ. प्रमुख नेते मंडळींनी आनंदाने मान्यता दिली. तसेच त्यांचे विश्वासू सहकारी श्री. नानासाहेब जाधव यांनी व इतर नेते मंडळीनी तुळशीदासांच्या प्रचार कार्यामध्ये भाग घेऊन खेडोपाडी जाऊन तुळशीदास जाधव यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले.

तुळशीदास जाधव यांच्या विरोधात संयुक्त महाराष्ट्र समितीचे श्री. जगन्नाथ शिवलींग विभुते उर्फ जंगम स्वामी, गणपतराव माणिकराव देसाई, शामराव लक्ष्मण देसाई व व्ही.डी. देशपांडे हे चार उमेदवार उभे होते. नांदेड लोकसभ मतदार संघ हा नांदेड, किनवट, देगलुर, बिलोली, हदगाव आणि कंधार हया सहा तालुक्यांचा होता. या मतदार संघामध्ये एकूण चार लाख अठ्ठेचाळीस हजार तीनशे तेरा (4,48,313) मतदार होते. त्यापैकी 2,56,817 एवढया मतदारांनी मतदान केले. त्यापैकी श्री. तुळशीदास जाधव यांना 1,39,217 शिवलिंग विभुते 79,975 गणपतराव माणिकराव 12,803 व शामराव देसाई 17,675 मते मिळाली. आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा 59,242 मते जादा मिळवून तुळशीदास जाधव हे विजयी झाले. अशा प्रकारे तुळशीदास जाधव हा असा चिरा आहे की त्याला कुठेही टाका तो निवडून येणारच. शेतकारी कामगार पक्षाच्या वेळच्या कष्टाची परिश्रमाची आणि राजकीय तपस्येची ही जनतेने दिलेली पावतीच होती. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.[5]

तुळशीदास जाधव लोकसभेवर खासदार म्हणून निवडून गेल्यानंतर थोडयाच दिवसानी 1962 साली चीनने नेफा आणि लडाख या भारतातील भागावर हल्ला केला. तेव्हा इंदिरागांधी

बरोबर श्री. तुळशीदास जाधव हे 22 ऑक्टोबर, 1962 रोजी मिलीटरीच्या स्पेशल विमानाने तेजपुरला गेले.[6]

तुळशीदास जाधव लोकसभेमध्ये खासदार म्हणून निवडून गेल्यानंतर त्यानी आपल्या बुध्दीचा उपयोग करून जनतेच्या समस्या लोकसभेमध्ये मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या भाषणात मा. रेल्वेमंत्री यांना बजेट बाबत संसदेत चर्चा सुरू असताना ते म्हणाले, सध्या भारतामध्ये रेल्वेची प्रगती फार मोठया प्रमाणात होत आहे. मागील 15 वर्षाच्या रेल्वेच्या आकडेवारीवरून असे लक्षात येते की, रेल्वेचे काम जोराने सुरू आहे ही आनंदाची गोष्ट आहे. 1950–51 मध्ये रेल्वेचे उत्पादन 827 करोड होते. 1960–61 मध्ये ते वाढून 1521 करोड झाले. त्यांच्यावरील कर 1955–56 मध्ये 317 करोड 50 लाख होते. तेच सन 1960–61 मध्ये 456 करोड झाले आणि सन 1962–63 मध्ये 546 करोड होण्याचा अंदाज आहे.

वरील आकडेवारीवरून असे लक्षात येते की रेल्वेने प्रवास करणा–या प्रवाशांची संख्या वाढत चालली आहे व त्यावर लावलेल्या प्रवास करात ही वाढ होत आहे.

यात्रिकांची संख्या वाढत चालल्यामुळे सरकारने टॅक्स आकारण्याचा विचार केला आहे. अप्पर क्लास 15 टक्के आणि थर्ड क्लास 10 टक्के वाढवण्यात आला आहे. तिस–या दर्जाच्या डब्यामध्ये प्रवाशांची जास्त गर्दी असते. त्यामुळे सरकारी नोकरांना त्यांना त्यांच्या अडचणी दूर करण्यास समस्या निर्माण होतात. त्यामुळे सरकारला कारभार चालवायचा असेल तर ते पैश्या व्यतिरिक्त चालवू शकणार नाहीत. पंरतु सरकारने जो टॅक्स वाढवला आहे त्यांच्या मानाने ज्या सवलती हव्या आहेत त्या प्रवाशांना मिळू शकत नाहीत. या सवलती मिळू न देण्याबाबत ऑफिसर

त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करतात व सरकारी अधिकारी हलगर्जीपणा करतात. त्याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे.

त्यानी आपल्या भाषणामध्ये लातूर–मिरज रेल्वे नॅरोगेज लाईन ऐवजी ब्रॉडगेज लाईन करावी. कारण नॅरोगेज असल्यामुळे स्टेशनवर फार गर्दी होते. याच लाईनवर पंढरपूर एक प्रसिध्द देवस्थान आहे. तेथे सर्व देशातील लोक देवदर्शनासाठी येतात लहान रेल्वे असल्यामुळे गर्दीचे प्रमाण वाढत आहे. इतर वाहनेही जास्त नसल्यामुळे तेथे बसण्यासाठी सुध्दा नीट जागा नसते. त्यामुळे सवलतीचा प्रश्नच तेथे उद्‌भवत नाही. त्यामुळे माझी एकच विनंती आहे की, या रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर व्हावे.

मराठवाडा हा महाराष्ट्रातील मागासलेला भाग आहे. तेथे वास्तविक पाहिले तर रेल्वेगाडया कमी आहेत आणि जो रस्ता आहे तो लहान रेल्वेचा असल्याने त्या ठिकाणी एवढी गर्दी होते की दोन दोन दिवस स्टेशनवर बसावे लागते. सोलापूर ते औरंगाबाद नवीन रेल्वे लाईन घालण्यासाठी त्यानी प्रयत्न केले. पुणे ते बेंगलोर हा छोटा रेल्वेलाईन आहे की हा ब्रॉड गेज करण्यासाठी इस्टिमेंट व सर्वे तयार झालेला आहे. लहान रस्ता असल्यामुळे लोकांना त्रास होत आहे. पुणे स्टेशनवर एका गाडीतील सामान उतरून दुस–या गाडीत ठेवावे लागते. त्यामुळे हा त्रास कमी करण्यासाठी पुणे–बंगलोर ब्रॉऊड गेज करणे आवश्यक आहे असे तुळशीदासांनी आपल्या भाषणात सांगितले.[7] ज्यावेळी दिल्ली मध्ये सरकारी हॉस्पिटलमध्ये असणा–या डॉक्टरांना त्यांच्या अपेक्षे एवढया सुखसोई नसल्यामुळे तेथील सरकारी हॉस्पिटलमधील डॉक्टर पेशंटची ऑपरेशन न करता डॉक्टर तेथून निघून गेले तेव्हा तुळशीदास जाधव यांनी सरकारला या सर्व गोष्टीची माहिती

नाही का असे विचारले व हे माहित असूनही सरकार गप्प का आहे याची काय व्यवस्था करायचे ठरवले आहे अशा प्रकारचा प्रश्न विचारून सरकारचे लक्ष दिल्लीतील सरकारी हॉस्पिटलवर देण्याची विनंती केली होती.[8]

रेल्वे अपघाताचे प्रमाण वाढत चालले असल्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी रेल्वे मंत्रीमहोदयाना आपल्या संसदेतील भाषणात सांगितले. सध्या अपघाताचे प्रमाण वाढत आहे. परंतु नियंत्रणामुळे ते प्रमाण कमी आहे. सध्या हे प्रमाण कमी होत चालले आहे ते बंद होणे आवश्यक आहे. अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी आपणास प्रयत्न करणे आवश्यक आहे. मी असे सांगू इच्छितो की अपघातकमीत कमी व्हावेत.

रेल्वेमुळे अपघात होण्याची रेल्वे पुल लेविन क्रोसिंग व प्लॅट फॉर्म ही महत्वाची तीन ठिकाणे आहेत. आज हया गोष्टीची आवश्यकता आहे की कोणत्या कारणाने रेल्वे अपघात होतो व ते होऊ नयेत. जर एकाच ठिकाणी वारंवार अपघात होत असतील तर त्याची कारणे शोधणे आवश्यक आहे.

सोलापूर जिल्हयातील मुंढेवाडी व पाकणी या दोन्ही रेल्वे स्टेशनच्या दरम्यान सिना नदीच्या रेल्वे पुलावर 28.5.1962 रोजी साडे आकरा वाजता अपघात झाला. त्यावेळी सोलापूर–पुना पॅसेंजरगाडी या रेल्वेपुलावर आली तेव्हा तेथे अपघात झाला. आजपर्यंत पुलावर 1946 ते 1962 या काळात 14 लोक मरण पावले आहेत. प्रथम या पुलावर फुटपाथ होते. परंतु कांही कारणाने ते पडले तेव्हा घालून तेथे फूटपाथच नाहीत. सोलापूर जिल्हयातील लोकांनी अनेक पत्रे पाठवली परंतु त्याचे उत्तर संसदेतील रेल्वे मंत्र्यानी पाठवले नाही. तेव्हा मा. एस. व्ही. शिंदे यांनी नऊ पत्र पाठवल्यानंतर त्यांनी असे उत्तर मिळाले की हा पूल रेल्वे खात्यातील

कामगाराकरता व रेल्वेसाठी आहे. सर्व सामान्य जनतेच्या वापरासाठी नाही तेंव्हा श्री तुलशीदास जाधवांनी सांगितले की सिना नदीच्या पुलाच्या आसपास 10–15 गावे आहेत. व त्या गावातील लोकांना इकडे–तिकडे जाण्यासाठी फुटपाथ शिवाय दुसरा मार्ग नाही सध्या तेथे फुटपाथ नाही त्यामुळे लोकांना इकडे–तिकडे करते वेळेस दोन महिला व एक पुरूषाचे रेल्वेखाली चेंगरून तुकडे–तुकडे झाले आहेत. अशा प्रकारचा भिषण अपघात झाल्यानंतर लोकांनी वारंवार पत्र व्यवहार करून केंद्र सरकारला व राज्य सरकारला कळवले आहे परंतू या कामाची दखल कोणच घेत नाही तेव्हा हे काम नेमके राज्य सरकारचे आहे की केंद्रसरकारचे सध्या तेथे फुटपाथ नसल्यामूळे अपघाताचे प्रमाण वाढत आहे तेंव्हा केंद्र अथवा राज्य सरकारने ताबडतोब रेल्वे रूळाच्या दोन्ही बाजूनी फुटपाथ बांधून घ्यावे ही विनंती आहे या पूलासाठी केवळ 70 हजार रूपये खर्च येणार आहे. तेव्हा मा. रेल्वे मंत्री महोदयांना मा. तुळशीदास जाधव यांनी मुढेवाडी व पाकणी जवळील पुलाच्या रेल्वे रूळाच्या दोन्ही बाजुला ताबडतोब फुटपाथ बांधावे असे म्हटले होते.[9]

ज्यावेळी सरकारने कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालामध्ये करण्यासाठी कारखान्याना लायसन्स देतेवेळी ते कारखानदारांना न देता व्यापा–यांना दिले जातात तर त्यामागील सरकारचे काय धोरण आहे हे सरकारने स्पष्ट करावे. असे श्री. तुळशीदास जाधव यांनी सांगितले.[10]

तुळशीदास जाधव यांनी जेव्हा सरकारने एखाद्या व्यक्तीला लायसन्स मिळवण्यासाठी अर्ज केल्यानंतर लायसन्स मिळते, त्यासाठी काय कायदा आहे व त्याना लायसन्स मिळण्यासाठी किती दिवसाचा कालावधी लागतो यासाठी आवाज उठवला.[11]

भारतामध्ये ऊसाचे क्षेत्र जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक राज्यामध्ये ऊसाची लागवड केली जाते व त्यांच्यापासून साखर तयार करणारे कारखाने प्रत्येक राज्यामध्ये आहेत. परंतु प्रत्येक राज्यामध्ये ऊसाचे दर आहेत ते व उत्तर प्रदेशमधील ऊसाचे दर यांच्यामध्ये फरक आहे. तर तो का फरक आहे असे श्री. तुळशीदास जाधव यांनी संसदेमध्ये मांडले.[12]

शेतक–यांना बँकेकडून कर्ज मिळवून देणेबाबत –

नांदेड लोकसभा मतदार संघातून तुळशीदास जाधव हे लोकसभेवर निवडून गेल्यानंतर त्यांनी कृषी वित्तीय महामंडळाविषयी जे बिल मांडले होते त्यासाठी कांही अडचणी आल्या आहेत. त्या मी मांडू इच्छितो. ज्या शेतक–यांच्या हितासाठी भू–विकास बँक, मध्यवर्ती सहकारी बँक आणि सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या सर्व बँकामार्फत शेतक–यांना कर्ज मिळते. परंतु सर्वात मोठी अडचण ही आहे की, एखाद्या शेतक–यांच्या जमिनीवर थोडे जरी कर्ज असेल तर शेतक–यांला परत कर्ज मिळत नाही. सध्या विचार केला तर जवळ जवळ 66 टक्के शेतकरी कर्जात आहेत. जर त्यांना कर्ज असताना दुस–या वेळेस कर्ज मिळत नसेल तर त्या सहकारी संस्था काय कामाच्या आहेत.

भू–विकास बँकेमध्ये पैसा शिल्लक आहे असे पत्र आम्हाला आले आहे त्यानी सांगितले की, बँकेकडे पैसा शिल्लक आहे. परंतु बँकेकडून कोणीही पैसे घेत नाहीत. त्यानी चौकशी केल्यानंतर असे समजले की शेतकरी हे कर्ज सहकारी सोसायटी मार्फत घेत आहेत. त्यामुळे बँकेकडून कर्ज मिळ शकत नाही. ज्यावेळी आराखडा पाहिला असता शेती कामासाठी होणारा खर्च शेतीवर न

होता तो औद्योगिकरणासाठी खर्च केला आहे. शेतक–यांने आपल्या शेतामध्ये खर्च करून उत्पादन वाढवणे व जे कर्ज आहे ते कमी करावे व आपला विकास करावा. परंतु तसे न करता शेतीवर खर्च करण्याविषयी तो खर्च औद्योगिकरणासाठी (इंडस्ट्रीसाठी) खर्च करण्यात आला.

जो शेतकरी आहे व त्यांच्या शेतावर काम करणारे इतर मजूर आहेत. त्यांची फार वाईट अवस्था आहे ते फार दारीद्रयात दिवस भोगत आहेत. त्यांच्यासाठी बॅकामार्फत कर्ज देऊन दारीद्रय दूर करण्यासाठी सरकारने प्रयत्न करावेत. [13]

ॲग्रीकल्चरल रिफाईनेस कार्प्रोरेशन बील शेतक–यांसाठी मांडले आहे. त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करू इच्छितो. तेव्हा मी सरकारला एवढेच सांगू इच्छितो की शेतक–याला उत्पादन वाढवण्यासाठी सरकारने लवकरात लवकर कर्ज द्यावे. कारण शेतकरी हा कर्जाच्या बोझ्याने वाकलेला आहे. त्यासाठी ते कमी करण्यासाठी कर्ज देऊन त्याना आपले उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करावे. सन 1957 पासून 1961–62 पर्यंत केंद्र सरकारने राज्य सरकारला कर्ज दिले आहे. त्यातील कांही पैसा केंद्र सरकारकडे आहे. केंद्र सरकार राज्यसरकारला निधी उपलब्ध करून देते. परंतु ते परत घेण्यासाठी सरकारने काय तरतूदी केल्या आहेत ? सरकारने ज्याकामासाठी पैसा दिलेला आहे त्याच कामासाठी खर्च झाला आहे की नाही ते पाहिले पाहिजे. सध्या सरकारने दूध डेअरी व पोल्ट्री फर्मसाठी शेतक–यांना कर्ज देणे आवश्यक आहे. शेतक–यांला अनेक कारणासाठी कर्ज घ्यावे लागते. जर शेतक–याला बॅकेकडून कर्ज मिळाले नाही तर सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते व शेतक–याला सावकाराचे जास्त टक्केवारीचे पैसे वापरावे लागणार आहेत. त्यामुळे शेतक–याला बॅकेकडून कमी व्याजाने कर्ज द्यावे. शेतक–याने

जे कर्ज घेतलेले असते ते 50 टक्के खर्च हा कुटुबासाठी होतो व बाकीचा पैसा हा उत्पादनासाठी केला जातो. त्यामुळे त्याचे अपेक्षेप्रमाणे उत्पादन वाढत नाही.[14] जो पैसा शेतक–याला मिळतो तो पैसा त्यांच्याहातात न मिळता सहकाकरी संस्थामार्फत मिळतो म्हणून तो पैसा शेतक–याच्या नावाने चेक काढून अथवा मनीऑर्डरने द्यावे. कारण जेवढा पैसा त्याच्या नावे मंजूर आहे तेवढा पैसा त्याच्या हातात मिळेल. भू–विकास बॅकेकडून शेतक–याला जे कर्ज मिळते त्यातून पंचवीस ते पन्नास रूपये शेअर्स म्हणून कट (कपात) केली जाते. त्यावेळी शेतकरी विचार करतो की, प्रथम सावकाराकडून कर्ज घेत होतो तेंव्हा शेअर्स कपात होत नव्हती. परंतु आता पैसे मिळण्याअगोदर 25 ते 50 रूपये खर्च होत आहेत. त्यामुळे शेतकरी बॅकेकडून कर्ज घेण्यास घाबरत आहे व या अडचणी दूर करण्यासाठी सरकारने काय व्यवस्था केली आहे. अशा प्रकारचा सवाल श्री. तुळशीदास जाधव यांनी सरकारला मांडला आहे.[15]

भारतामध्ये 1961–62 व 1962–63 या काळामध्ये भारत सरकारने अन्नधान्य व फळफळावळ परदेशातून आणली आहेत तर त्या मालाची प्रत काय आहे ? असा प्रश्न श्री. तुळशीदास जाधव यांनी अन्नधान्याच्या प्रतिबाबत संसदेत मांडला.[16]

भारतातील जे बातमीपत्र छापले जात आहे ते खेडयातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचत नाहीत. देशातील घडामोडी ग्रामीन भागातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचत नाहीत. त्यासाठी बातमीपत्राची कागदपत्राचे कारखाने कमी आहेत. त्यासाठी सरकारने काय व्यवस्था केली आहे ?[17]

देशातील टी.बी. रूग्णाबाबत –

भारत देशामध्ये टी.बी. या रोग्यांची संख्या वाढत आहे. व टी.बी. च्या रोगावर उपचार करणारे दवाखाने कमी आहेत. त्यासाठी रोग्यांची संख्या जास्त असल्यामुळे दवाखाण्यातील डॉक्टरांनी टी.बी. रोग्यांच्या घरी जाऊन त्यावर असणारी लस टोचण्याची सरकारने व्यवस्था करावी अशी मागणी श्री. तुळशीदास जाधव यांनी लोकसभेमध्ये 1965 मध्ये केली. [18]

नांदेड लोकसभा मतदार संघातून निवडून आलेले खासदार श्री. तुळशीदास जाधव यांनी लोकसभेमध्ये विनायकराव पाटील यांना सभेमध्ये बोलण्यास विरोध केला तेव्हा केलेले भाषण ..... महाराष्ट् प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. विनायकराव पाटील हे नगर हवेलीमधील लोकांनी बोलावलेल्या मिटींगला आले असता तेथील पोलीसांनी त्यांना बोलण्याविषयी विरोध दर्शवला. घटनेमध्ये जे दहा मुलभूत अधिकार दिले आहेत. तरीही विनायकराव पाटील यांना सभेसाठी का विरोध केला. तेथील लोकांनी त्यांना सभेसाठी बोलावून घेतले होते. पोलीसांनी त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता त्यांना सभा करण्यासाठी मनाई केली व त्यांना सांगितले की, तुम्हाला मिटींग घेण्यास मनाई आहे. ते जेव्हा सैलगाव मध्ये गेले तेव्हा त्यांना विश्रांतीसाठी विश्रामगृह दिले नाही. तेव्हा मी आपणास विचारू इच्छितो की, तेथील जे सरकारी अधिकारी आहेत त्यांना बंदी करण्याचे आदेश दिले होते काय ? वरील गोष्टीचा पुणे महानगरपालिकेने निषेध व्यक्त केला आहे. मा. विनायकराव पाटील यांनी मा. नंदीजीसे पत्र पाठवून या प्रकाराविषयी कळवले आहे. तेव्हा केंद्र सरकारला माझी एक विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारच्या समस्या निर्माण होतात

त्यासाठी सरकारने लक्ष देणे आवश्यक आहे.[19] असे प्रकार परत घडू नयेत म्हणून काळजी घेणे जरूरीचे आहे.

मा. उपराष्ट्रपतीने आपल्या भाषणामध्ये असे सांगितले होते की जर देशाचा विकास करायचा असेल तर त्यासाठी उत्पादन वाढवावे लागणार आहे व त्यासाठी लोकांना काम मिळाले पाहिजे. आज शहरामध्ये व ग्रामीन भागामध्ये बेकारी वाढत आहे व लोकांना काम मिळत नाही. तेव्हा मा. तुळशीदास जाधव यांनी आपल्या भाषणात म्हणाले, बेकारी वाढत आहे त्यासाठी देशातील सर्व बेकार लोक आहेत त्यांना काम देऊन उत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे. कपडयाचे उत्पादन वाढवावे व अन्नधान्य यांचे उत्पादन वाढवावे तेव्हा लोकांना काम देऊन देशाचे उत्पादन वाढवावे. उत्पादन कमी असेल तर देशाचा कारभार चालवणे अवघड होईल.[20]

भारतामध्ये अनेक समुहाचे अनेक जाती धर्माचे लोक रहातात तेव्हा त्यांच्या हातून कांही वाईट गोष्टी होऊ शकतात. तेव्हा त्यांच्या हातून वाईट गोष्टी टाळण्यासाठी सरकारच्या हाती कांही अधिकार असणे आवश्यक आहेत. गोंधळाच्या वेळेस फायरींग व लाठी हल्ला करण्याची गरज आहे. तेव्हा एक गोष्ट आहे, जेव्हा भारतामध्ये स्वराज्यासाठीची चळवळ सुरू होती तेव्हा पासून भारतातील लोकांना लाढीहल्ला व फायटींग यांचा अनुभव आहे. मी गुन्हेगारी विषयी जी प्रक्रिया आहे ते पाहिले आहे. परंतु त्याची अंमलबजावणी आणखीन झालेली नाही. हा कायदा जेव्हा तयार केला तेव्हा भारतावर परकियांचे राज्य होते. इंग्रज आपल्यावर दहशत बसवून राज्य करत होते. ते लोकांच्या हितासाठी राज्य करत नव्हते. तेव्हा भारतीय लोक त्याला विरोध करत होते. तेव्हा लोकांना समझावण्यासाठी व त्यांना गप्प करण्यासाठी हा कायदा उपयोगात आणला

आहे. आज 17 वर्षे झाली तेव्हा त्याची अंमलबजावणी झाली नाही. भारतामध्ये लोकशाही आहे, तेथे शिक्षणाची आवश्यकता आहे, लोकशाहीमध्ये दडपणाने नव्हे तर संयमाने कामे होऊ शकतात.

एक वेळ अशी होती की जेव्हा आम्ही स्वातंत्र्यासाठी चळवळ करत होतो तेव्हा तेथील कलेक्टर कोणत्याही प्रकारची वार्निंग न देता कलेक्टर फायरींग करण्यासाठी पोलीसांना परवानगी देत. त्यामुळे देशामध्ये किती लोक मारले जातात याचा कधीही विचार केला जात नव्हता. तेव्हा माझी अशी विनंती आहे की, जेव्हा एखाद्या ठिकाणी चळवळ करण्यासाठी लोक एकत्र जमलेले असतात तेव्हा त्यांना लाऊडस्पीकर लाऊन एकत्र जमलेल्यांना विभक्त होण्यासाठी सांगण्याची गरज आहे व तशा प्रकारची वार्निंग देणे आवश्यक आहे व मगच गोळीबार करावा. अन्यथा मोठे अनर्थ होण्याची भिती असते.[21]

अन्नधान्याच्या किंमतीबाबत –

देशामध्ये अन्नधान्याच्या किंमत वाढत आहेत. देशामध्ये 1962 मध्ये गव्हाचा भाव 16 रूपये मन एवढा होता. तर 1964 मध्ये 25 ते 30 रूपये मन एवढा वाढला. दुस–याही अन्नधान्याचे ज्वारी मका यांचे भाव 50 टक्के एवढे वाढले आहेत. तर देशामध्ये अन्न धान्याचे उत्पादन वाढले नाही तर बेकारीचे प्रमाण वाढणार आहे. देशामध्ये लोकसंख्या दिवसेदिवस वाढत आहे व उत्पादन कमी होत आहे. त्यामुळे उत्पादन वाढवण्यासाठी सरकारने उपाय योजने आवश्यक आहे. जर उत्पादन वाढले नाही तर लोकांची हालत फार वाईट होईल.

रशियामध्ये सर्व तंत्रज्ञान असताना व तेथील लोकांना काम असताना तेथील शेती ही आधुनिक तंत्रज्ञानावर चालली असताना तेथील लोकांना गव्हू कमी पडला असताना त्यांनी अमेरिकेकडून गव्हाची मागणी केली होती. तेव्हा तेथे आधुनिक तंत्रज्ञान असतानाही गहू कमी पडला तेव्हा मी असे सांगू इच्छितो की, आपल्या देशातील 45 करोड लोकांना काम देऊन उत्पादन वाढवावे. त्यांना काम न देता दुस–याकडून अन्नधान्य मागवून किती दिवस चालणार आहे त्यासाठी खेडयातील व शहरातील लोक आहेत. त्यांना काम देऊन अन्नधान्य वाढवणे आवश्यक आहे.[22]

शेतक–यांना इंजीन तेल व बिल मिळणेबाबत महाराष्ट्रामधील शेतक–यांना आपल्या पिकांना पाणी देण्यासाठी विहिरीवर इंजिन, विद्युत मोटारी बसवलेल्या आहेत. परंतु शेतक–यांना वापरण्यासाठी लागणारे इंजिन तेल त्यांना मिळत नाही. शेतक–यांना आपल्या अन्नधान्यात वाढ करण्यासाठी पिकाला पाणी देण्याची आवश्यकता असते. परंतु तेलाअभावी शेतक–यांना पिकांना पाणी देता येत नाही. अन्नधान्य वाढल्याशिवाय विकासाची कामे करता येत नाहीत. विकासासाठी सरकारने पंचवार्षिक योजना सुरू केल्या. परंतु त्यामध्ये तफावत होत गेली. खाद्य तेलाचे उत्पादन वाढवणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रथम डिझेल व विद्युत मोटारीसाठी विजेची आवश्यकता आहे. कारण आपणास ज्या गोष्टीची प्रथम आवश्यकता आहे ती गोष्ट मिळणे म्हणजे वीज व इंजिनसाठी तेल मिळणे आवश्यक आहे. तुळशीदास जाधव हे महाराष्ट्रामध्ये दौ–यावर आल्यानंतर त्यांच्याकडे अशा तक्रारी आल्या की तेलाअभावी व वीजे अभावी विद्युत पंप व इंजीन बंद आहेत. त्यामुळे पिकाना पाणी मिळत नसल्यामुळे सुकू लागली आहेत. अशी महाराष्ट्राची स्थिती आहे. एकीकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक सांगत आहेत की, येत्या दोन वर्षात महाराष्ट्र

अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण होईल. त्यानी ही घोषणा या आधारावर केली की, केंद्र सरकार महाराष्ट्र सरकारला सहाय्य करेल व महाराष्ट्रातील खेडी स्वावलंबी बनतील. वरील सर्व विवेचनावरून माझी एकच विनंती केंद्र सरकारला आहे की, आम्हाला जे इंजिनसाठी लागणा–या तेलाची आवश्यकता आहे ते तेल महाराष्ट्राला लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावे.[23]

राष्ट्रीय अन्नधान्य योजने अंतर्गत एखाद्या ठिकाणी उत्पादित झालेले अन्नधान्य तेथील लोकांना न देता ते दुस–या राज्यात निर्यात केले जाते व तेथे तयार झालेले अन्नधान्य इतर राज्यातील जिल्हयाना दिले जाते. तेव्हा जेथे पिकते तेथील अन्नधान्य दुस–या जिल्हयात निर्यात करण्याची काय गरज आहे ? कारण जेथे पिकते तेथील लोकांना ते मिळत नाही. उदा. – महाराष्ट्रामध्ये ज्वारीचे पीक मोठया प्रमाणात होते. परंतु तेथील लोकांना मका दिला जातो. तेव्हा सरकारला विनंती करतो की, महाराष्ट्रातील लोकांना ज्वारी मिळाली पाहिजे असे परखड मत संसदेमध्ये तुळशीदास जाधव यांनी मांडले.[24]

डॉक्टरांच्या पगारात वाढ करणेबाबत –

सरकारने ग्रामीण भागातील आरोग्याच्या दृष्टीने खेडयामध्ये सरकारी दवाखाने उघडले आहेत. परंतु डॉक्टरांची संख्या कमी आहे. कारण डॉक्टरांना पगार फार कमी आहेत. त्यामुळे ते नोकरी सोडून खाजगी व्यवसाय करतात. त्यामुळे खेडयातील लोकांना डॉक्टरांची सेवा मिळत नाही. त्यासाठी सरकारने काय उपाय योजना करावयाची ठरवले आहे. सरकारने त्यांच्या पगारात वाढ करून ते परत सरकारी दवाखान्यात जाऊन सेवा करू शकतील.[25]

1967 ची सार्वत्रिक निवडणूक –

तुळशीदास जाधव यांनी नांदेडसारख्या प्रशस्थ व दुस–या जिल्हयातून भरघोस मतानी निवडून येणा–या आणि आपल्या अपेक्षेप्रमाणे मराठवाडयासारख्या मागासलेल्या नांदेड जिल्हयाला नंदनवनाचे स्वरूप आणून देणा–या तुळशीदासजीबद्दल कॉग्रेस श्रेष्ठीचा आत्मविश्वास एवढा वाढला की तुळशीदासजींना कोणत्याही जिल्हयातून उभे केले तरी ते हमखास निवडून येतील. इतकेच नव्हे तर त्या जिल्हयाचा कायापालट करतील. आणि हयाच आत्मविश्वासाने कॉग्रेस श्रेष्ठीने 1967 सालच्या सार्वत्रिक निवडणूकीस तुळशीदासजींना बारामती मतदार संघातून कॉग्रेसचे उमेदवार म्हणून लोकसभेसाठी उभे करण्यात आले. नांदेड जिल्हयात केलेल्या कार्याची पावती घेऊन तुळशीदास जाधव बारामती मतदार संघामध्ये प्रचार करत होते. याच मतदार संघात तुळशीदासांच्या विरोधात श्री. बाजीराव कांबळे, श्री. नारायण पाटील, श्री. रामचंद्र सोनावने हे प्रतिस्पर्धी उमेदवार उभे होते. तुळशीदासांच्या कार्याबद्दल विरोधकांना बोलण्यास तोंडच नव्हते. तेव्हा त्यांनी बारामतीवर परका उमेदवार लादला हेच विरोधकांचे प्रचाराचे हत्यार होते. तुळशीदासजींनी याचा वापर आपल्या प्रचारात न करता सभा घेऊन बैठका बोलावून "कॉग्रेस हा संघटीत असा पक्ष असल्यानेच या शासनाला पाकिस्तानचा पराभव करता आला. पण पाकिस्तान कायमचे हल्ले करण्याचे थांबवणार नाही असे समजणे चुकीचे आहे. तेव्हा ते थांबवण्यासाठी कॉग्रेसला मते देऊन शासन बळकट करा. तेव्हा मतदानानंतर श्री. तुळशीदास जाधव हे आपल्या विरोधी उमेदवारांपेक्षा भरघोस मते घेऊन बारामती लोकसभा मतदार संघातून निवडून आले.[26]

श्री. तुळशीदास जाधव हे बारामती लोकसभा मतदार संघातून निवडून आल्यानंतर त्यांनी आपल्या भाषणातून संसदेमध्ये आवाज उठवून विकासाची कामे करण्याचा प्रयत्न केला. भारतामध्ये अनेक इयर लाईन आहेत. परंतु त्या नुकसानीत आहेत असे म्हटले जाते. उदा. भारतामध्ये मुंबई – दिल्ली, मुंबई – कलकत्ता, दिल्ली – कलकत्ता या लाईन आहेत. यापैकी कोणत्या लाईनवर नुकसान होत आहे ते स्पष्ट करावे.[27]

श्री. तुळशीदास जाधव यांनी आपल्या भाषणामध्ये संसदमध्ये चाललेल्या कारभाराविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणाले की, संसदेमध्ये नियमानुसार कारभार चालत असतो. परंतु कांही जुने मेंबर्स आपल्या मर्जीनुसार चालवण्याचा प्रयत्न करतात. जे सर्वात सिनियर मेंबर आहेत ते नवीन सदस्यांचे म्हणणे एकून घेत नाहीत. आम्ही नवीन मेंबरर्स आमचे विचार मांडत असताना त्याकडे दुर्लक्ष केले जाते. हे सभागृह लोकशाही राज्यातील सभागृह आहे. लोकसभा हे संसदेचे वरील सभागृह आहे. त्यामुळे प्रत्येक सदस्याला लोकशाही प्रणालीप्रमाणे समान अधिकार आहे. मी हे जे आपले म्हणणे निवडणूकीच्या वेळी मांडले आहे ही लाजिरवाणी गोष्ट नव्हे. जे माझे प्रामाणिक मत व्यक्त केले आहे. तेव्हा त्याचा वरिष्ठानी सहानुभूतीपूर्वक विचार करावा.[28]

बारामती लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधित्व करत असताना भिवानी तहसिल कार्यालयामध्ये आकस्मित सहाय्यता निधी उपलब्ध करून देण्याबाबत काम केले. त्यानी कृषी मंत्र्यांना आपले विचार व्यक्त करून दाखवले.

1. हरियाना सरकारने आकस्मित निधीअंतर्गत भिवानी तहसिल कार्यालयासाठी किती रक्कम मंजूर केली आहे.

2. ठरवून दिलेल्या रकमेपैकी किती रक्कम खर्च करण्यात आली आहे ?

3. हरियाना सरकारने चालू आर्थिक वर्षामध्ये "64 अकाल सहाय्यता" या योजनेखाली भिवानी तहसिलच्या कार्यक्षेत्राखालील क्षेत्रामध्ये 11.50 लाख रूपये मंजूर केले होते.

4. मंजूर केलेल्या राशीपैकी आजपर्यंत 2, 23, 423, 73 रूपये खर्च झाले आहेत.

वरील केलेल्या विवेचनावरून श्री. तुळशीदास जाधव यांनी कृषी मंत्र्यांना हे स्पष्ट करण्यास सांगितले की –

1) अकाली सहाय्यता निधी अंतर्गत भिवानी तहसिल मध्ये विहिरी खोदण्यावर हरियाना सरकारने किती रक्कम खर्च केली आहे.

2) भिवानी तहसिलमध्ये विहिरी खणण्याचे काम केव्हा पूर्ण होण्याची शक्यता आहे. हे कृषीमंत्र्यांनी विषद करावे.[29]

आंध्र प्रदेशातील पेट्रोल किंमतीबाबत चर्चा चालू असताना तुळशीदास जाधव यांनी सरकारला विचारले की, "पेट्रोल वरील जो टॅक्स (कर) येतो त्याचे कोणत्याप्रकारे वाटप केले जाते. त्यातून खेडयातील रस्त्यासाठी किती खर्च होतो त्याबाबत सरकारने काय निर्णय घेतला आहे.[30]

कामगार संघटनेबाबतचे मत तुळशीदास जाधव यांनी लोकसभेमध्ये कामगारांच्या युनियन बाबत आपले विचार प्रकट करताना सांगितले की, एखाद्या कारखान्यामध्ये अनेक युनियन असल्यामुळे त्यांच्यात भांडणे सुरू होतात. त्यामुळे कामगारांना नुकसान सोसावे लागते आणि त्यांचा फायदा मालक उठवत असतो. मी सुध्दा बरेच दिवस सोलापूरमध्ये कामगार युनियनमध्ये

काम केले आहे. आणि कामगार संघटनाही स्थापन केल्या आहेत. एक संघटनेऐवजी अनेक संघटना असल्यामुळे त्यांच्यात परस्पर स्पर्धा वाढत आहे. त्यामुळे बंड केल्यानंतर मालक लोक म्हणतात की, एक संघटना अमुक गोष्टीची मागणी करते तर दुसरी संघटना वेगळीच मागणी करते तेव्हा आम्ही कोणत्या संघटनेचे म्हणणे ऐकावे तेव्हा ज्या संघटनेला मान्यता आहे त्या संघटनेशी व्यवहार करणे आवश्यक आहे. म्हणण्यासाठी ठिक आहे की, एका धंद्यामध्ये एकच संघटना असणे आवश्यक आहे. परंतु माझा अनुमान असा आहे की, जेव्हा असे होते की, एका संघटनेची ताकद कमी होते. अशा स्थितीमध्ये युनियनच्या पदाधिका–यांना त्याचे भय वाटत नाही की, त्यानी एखादे वाईट (अयोग्य) काम केले तरी दुसरी संघटना त्यास विरोध करेल. तेव्हा दुसरी संघटना असल्यामुळे संघटनेचे पदाधिकारी मालकाबरोबर चर्चा करतील. त्यामुळे कांही वेळा मजुरांना कांही वेळेस तोटा ही सहन करावा लागेल. परस्परामध्ये स्पर्धा राहण्यासाठी कोणती संघटना योग्य प्रकारे काम करत आहे आणि कोणती करत नाही हे मालकाला समजते. त्यामुळे कारखान्यामध्ये दोन संघटना असणे जरूरीचे आहे. जरी दोन युनियन असल्यातरी त्यांच्या परस्पर स्पर्धेमुळे इतर कामगारांचे नुकसान होऊ नये हे पाहिले जावे. कोणतीही संघटना असो ज्या त्या कडे 15 टक्के सभासद आहेत त्यांना मान्यता देणे आवश्यक आहे. कांही वेळेस असे ही होऊ शकते की, एखाद्या संघटनेला मान्यता मिळाली की त्यांचे संबंध मालकाशी चांगल्या प्रकारे येतात. तेव्हा त्या संघटनेतील कर्मचारी संपूर्ण काम करतात की नाही ही शंका निर्माण होते. कारण ते सरकारची संघटना आहे त्याला सहकार्य करणा–यांची एक संघटना आहे. त्यांना मान्यता मिळाली आहे. तेव्हा अशी शंका निर्माण होते की, या संघटनेचे सभासद योग्य आहेत की नाहीत व सरकार

त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करते काय व त्यावर सरकारने आपले नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.[31]

श्री. तुळशीदास जाधव यांनी सभागृहामध्ये स्टील (लोखंडी) ची आपल्या देशामध्ये गरज आहे हे स्पष्ट करताना सांगितले व ती गरज सरकारकडून पुरी केली जावी. त्यासाठी सरकारने काय योजना आखली आहे. आतापर्यंत सरकारने तीन प्लॅन (योजना) झाले आहेत. चौथा प्लॅन सुरू होणार आहे. (स्टिल हॅपी इंजिनिअरिंग विभाग हा पब्लिक सेक्टर प्रमाणे झाला पाहिजे.) म्हणजे लोखंडावर अवलंबून रहाणारा इंजिनिअरिंग हा विभाग लोक कल्याणावर अवलंबून असला पाहिजे. आपल्या देशामध्ये सहकाग्र आणि साम्यवाद यांची रचना केली आहे. या दृष्टिकोनातून पाहिले तर मोठ मोठे उदयोगधंदे राज्याच्या आणि सरकारी तत्वाच्या आधारे असला पाहिजे. परंतु या बरोबर जे उद्योग खाजगी स्वरूपात आपल्या विभागामध्ये चालतात ते कोणत्या प्रकारे आपली आर्थिक परिस्थिती सुधारतात. परंतु सहकारी तत्वावरील उद्योगधंदे आपला आर्थिक विकास का करू शकत नाहीत आणि म्हणून सरकारने या गोष्टीची दखल घेणे आवश्यक आहे. आतापर्यंत विरोधक आणि त्यांचे सहकारी कम्युनिष्ठ मित्र यांच्या दृष्टीने ते सामाजिक सिध्दांताचा पुरस्कार करतात. आणि आम्ही म्हणतो की, जे उत्पादन आहे त्यावर कोणत्याही उद्योगपतीचे किंवा एका व्यक्तीचे नियंत्रण असू नये व त्यांच्या उद्योगधंदयातून होणारे उत्पन्न देशासाठी व्हावे. आम्ही असे म्हणत नाही की, ते उदयोग देश हितासाठी चालवत असताना त्या उदयोजकांचे त्यातून नुकसान व्हावे.[32]

वृध्दांना पेन्शन सुरू करणेबाबत –

तुळशीदास जाधव यांनी वृध्द लोकांना पेन्शन सुरू करावी अशा प्रकारची मागणी लोकसभेमध्ये केली. कारण आपल्या देशामध्ये असे लोक आहेत की, ते कमवत असूनही आपल्या आई–वडिलांना सांभाळत नाहीत. तेव्हा सरकारने त्यांच्या कमाईतून कांही हिस्सा घेऊन त्यामध्ये कांही सरकारने घालून तो पैसा वृध्द लोकांना सहायृयता निधी म्हणून द्यावा. जे केंद्रीय (केंद्र सरकारचे) नोकर आहेत त्यांच्या पगारातील थोडा हिस्सा सरकारने घ्यावा व राज्य सरकारी कर्मचा–यांच्याही पगारातील हिस्सा राज्य सरकारने घ्यावा असे आदेश केंद्र सरकारने राज्य सरकारला द्यावेत. तेव्हा केंद्र सरकारने त्यांच्या उत्पन्नातून कांही हिस्सा घेऊन वृध्द लोकांना सांभाळण्याची व्यवस्था करावी.[33]

स्डडी ग्रुप ऑफ रोड सेफ्टी कमिटीचे चेअरमन 1969 मध्ये श्री. तुळशीदास जाधव हे लोकसभेचे सदस्य असतानाच त्यांच्या अभ्यासू, सतत उद्योगी, तळमळीच्या जबाबदार कार्यकर्त्यांकडे एखादी महत्वाची जबाबदारी सोपवून त्यांच्या सद्गुणाचा देशाला उपयोग करून घ्यावा म्हणून "स्टडी ग्रुप ऑफ रोड सेक्टी कमिटी ही केंद्रसरकारने नेमली व या कमिटीचे चेअरमनपद श्री. तुळशीदास जाधव यांना दिले गेले तेंव्हा त्यांनी भारतातील रस्त्यांची सुधारणा करावयाची म्हणजे सध्या त्या रस्त्याची स्थिती काय आहे हे पाहण्यासाठी त्यांनी भारतभर दौरा केला. कन्याकुमारी पासून ते काश्मीरपर्यंत त्यांनी दौरा केला. त्यानी शहरांना व खेडयांना भेट देऊन जेथे रस्त्यांची आवश्यकता आहे त्यासाठी नेमके काय केले पाहिजे हे शाधून काढले. रस्त्याचे अपघात टाळावे म्हणून "रस्त्यांचा उपयोग सावधगिरीने कसा करावा" यासाठी शाळा

महाविद्यालये, ट्रकवाले, कारवाले यांना बोलावून त्यांच्या सभा घेऊन अपघात टाळण्यासाठी काय केले पाहिजे या विषयी चर्चा केली व जनतेसाठी दळणवळणासाठी सोय कशी सुलभ करता येईल या विषयी रात्रंदिवस मेहनत घेऊन एक अहवाल पंतप्रधान इंदिरा गांधीना सादर केला. तेव्हा याच कमिटीला सोलापूर जिल्हयाच्या दौ–यावर आणून मोहोळ तालुक्यातील त्यावेळचे वळण काढून महाराष्ट्र सरकारने रस्ता सरळसरळ केला. त्यानी वडवळ जवळील रेल्वेपुल सरळ करण्यास प्रयत्न केले. अशा प्रकारे त्यांनी "स्टडी ग्रुप ऑफ रोड सेक्टी कमेटीवर असताना अनेक कार्ये केली.[34]

भारतातील जीवन बीमा निगम द्वारे उद्योग दिलेले सहाय्य यांचे आकडे पाहिले तर असे लक्षात येते की, 64.29 टक्के रक्कम ही मोठया दहा उद्योग समुहाना दिले जाते व राहिलेले सहाय्य हे इतर उद्योगांना दिले जाते. तेव्हा मी आपणास विचारू इच्छितो की, हे अधिक सहाय्य या दहा समुहांना का दिले आहे ? तेव्हा जे लहान उद्योगधंदे आहेत त्यांचे उद्योगपती आपणाकडे कर्जाची मागणी करत नाहीत काय ? असा सवाल श्री. तुळशीदास जाधव यांनी लोकसभेमध्ये मांडला.[35]

अखिल भारतीय कॉंग्रेस सोशालिस्ट इन् ॲक्शनच्या तिस–या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून श्री. तुळशीदास जाधव यांची निवड झाली होती. तेव्हा ते आपल्या भाषणात म्हणाले, "पुरोगामी विचाराला पोषक असलेल्या या महाराष्ट्राच्या भूमीने सामाजिक, राजकीय व आर्थिक विषमतेच्या विरूध्द नेहमीच आपली न्यायाची भूमिका स्पष्टपणे मांडली आहे व आपली राष्ट्रीय जबाबदारी पार पाडली आहे. या भूमीने समता न्याय व विश्वबंधुत्व यांची पताका नेहमीच उंचावून धरली आहे. सामाजिक क्रांतीची बीजे याच भूमीत पहिल्यांदा अंकुरली आहेत.

दलित पिढीत मागासलेल्या आणि श्रमजीवी मध्यम वर्गीयांची सेवा करण्यासाठी याच भूमीने हजारो कार्यकर्ते पुरवले आहेत. सेवाभावे वृत्तीने काम करणा–या कार्यकर्त्यांची ही भूमी आहे. याच भूमीतून शाहू महाराज, महात्मा फुले, टिळक, आगरकर, महर्षी शिंदे, महर्षी कर्वे भाऊराव पाटील बाबासाहेब आंबेडकर, शंकरराव मोरे, शंकरराव जेधे, नाना पाटील इ. अनेक ज्ञात व अज्ञात समाजसेवक याच भूमीचे दिले आहेत.

महाराष्ट्राने देशातील बहुसंख्य राजकीय पक्षांना पुरोगामी नेतृत्व पुरवले आहे. पुरोगामी विचारांचे बाळकडू या सर्वांना येथील परंपरेने मिळाले आहे. सत्ता संपत्ती व बुध्दी यांचे वेगवेगळया ठिकाणी झालेले केंद्रीकरण निरोगी व समतेच्या समाजधारणेस घातक ठरले म्हणून महाराष्ट्रात पंचायती राज्य येऊन सत्तेचे विकेंद्रीकरण, सहकारी चळवळीचे विकेंद्रीकरण व ग्रामीण भागातील शिक्षण प्रसाराने बौध्दिक मक्तेदारीचे विकेंद्रीकरण झाले आहे.

अशा या महाराष्ट्राच्या जगप्रसिध्द अशा राजधानीत भारतातील नामवंत नेते व शेकडो कार्यकर्ते या अधिवेशनास देशाच्या भाग्योदयाच्या विचारासाठी आलेले पाहून आम्हा महाराष्ट्रीयांस झालेल्या आनंदाने कॉंग्रेस फोरमच्या महाराष्ट्र शाखेतर्फे आभार मानून तुळशीदास जाधव यांनी आपले भाषण संपवले.[36]

अशा प्रकारे लोकसभेवर निवडून गेल्यावर तुळशीदासर्जीनी बारामतीचे अनेक प्रश्न मांडून ते सोडवण्याचा प्रयत्न केला. विविध विषयावर भाषणे केली. शेतकरी आणि कामगार हिताचे दृष्टीने जागृत केले. 1962 ते 1971 पर्यंत ते लोकसभेवर होते. त्यांनी नांदेड व बारामती या दोन लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केले होते. या काळात कै. पं.जवाहरलाल नेहरू, कै.

लालबहादुर शास्त्री व श्रीमती इंदिरा गांधी व तीन पंतप्रधानांच्या कार्यपध्दतीचे तुळशीदासजींनी सुक्ष्मरितीने मनन केले होते व आपल्या व्यक्तिमत्वाचा लोकसभेवर प्रभाव पाडून कार्य करण्याचा प्रयत्न करत होते.

प्रकरण चौथे

संदर्भ सूची

1. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 169 ते 177, – व्यं.गो. अंदुरकर.

2. "संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सोलापुरचा सहभाग " , संशोधक – बी.आर. काळे (पाटील) या प्रबंधातील पान नं. 88.

3. सोलापूर समाचार – 2–4–1957

4. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 171, – व्यं.गो. अंदुरकर.

5. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 183 – व्यं.गो. अंदुरकर.

6. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 184 – व्यं.गो. अंदुरकर.

7. लोकसभा चर्चासत्र, खंड–1, 28 एप्रिल, 1962, पान नं. 537 ते 540.

8. लोकसभा चर्चासत्र, खंड 5 – 12 जून, 1962, पान नं. 10196.

9. लोसभा चर्चासत्र, खंड 5 – 12 जून, 1962, पान नं. 11535 ते 11538.

10. लोकसभा चर्चासत्र, खंड 5 – 15 जून, 1962, पान नं. 10760.

11. लोकसभा चर्चासत्र, खंड 5 – 22 जून, 1962, पान नं. 12422.

12. उपरोक्त, 16 जून, 1962, पान नं. 11053.

13. लोकसभा चर्चासत्र खंड–13 – 19 फेब्रुवारी, 1963, पान नं. 226–227.

14. लोकसभा चर्चासत्र खंड–13 – 28 फेब्रुवारी, 1963, पान नं. 1476, 77, 78.

15. लोकसभा चर्चासत्र खंड 13 – 28 फेब्रुवारी, 1963, पान नं. 1525–27.

16. उपरोक्त – 19 फेब्रुवारी, 1963, पान नं. 80.

17. उपरोक्त – 19 फेब्रुवारी, 1963, पान नं. 683.

18. लोकसभा चर्चासत्र – 15 एप्रिल, 1965, पान नं. 1368.

19. तुळशीदास जाधव यांचे 16/2/1964 रोजीचे भाषण सायक्लोस्टाईल प्रत.

20. उपरोक्त.

21. लोकसभा चर्चासत्र खंड – 15 एप्रिल, 1965, पान नं. 9568, 69.

22. तुळशीदास जाधव (एम्.पी.) यांचे 16/2/1964 रोजी केलेले भाषण सायक्लोस्टाईल प्रत.

23. लोकसभा चर्चासत्र खंड– III – 11 एप्रिल,1966, , पान नं. 10329, 36.

24. लोकसभा चर्चासत्र खंड– III – 12 एप्रिल,1966, , पान नं. 10415.

25. उपरोक्त, 14 एप्रिल, 1966 – पान नं. 10709.

26. चणे खावे लोखंडाचे, पान नं. 201–202 – व्य.गो. चंदुरकर.

27. लोकसभा चर्चासत्र खंड– 1 – 28 मार्च ,1967, , पान नं. 1215.

28. लोकसभा चर्चासत्र खंड– 1 – 28 मार्च ,1967, , पान नं. 1585–86.

29. लोकसभा चर्चासत्र खंड– 12 – 12 फेब्रुवारी ,1968, पान नं. 1224–25.

30. लोकसभा चर्चासत्र खंड– 19 – 19 ऑगस्ट, 1968, पाननं. 2431.

31. लोकसभा चर्चासत्र खंड– 16 – 11 एप्रिल, 1968, पान नं. 257 ते 259.

32. लोकसभा चर्चासत्र खंड–28 – 28 एप्रिल, 1969, पान नं. 220, 221.

33. लोकसभा चर्चासत्र खंड– 30 – 11 मार्च, 1969, पान नं. 8.

34. चणे खावे लोखंडाचे , पान नं. 205, – व्यं. गो. अदुरकर.

35. लोकसभा चर्चासत्र खंड– 38 – 24 मार्च, 1970.

36. अखिल भारतीय कॉग्रेस फोरम महाराष्ट् शाखा – स्वागत समिती चेअरमन श्री. तुळशीदास जाधव यांचे भाषण, दि. 25/12/1969. सायक्लोस्टाईल प्रत.